# उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे शहर यांचे कार्यालय

## गांवदेवी मंडई इमारत,पहिला मजला गांवदेवी मैदानाजवळ ठाणे (प)

दुरध्वनी क्रं.०२२.२५४१६०६६ ईमेल dyr.tna.thanecity@gmail.com

जा.क.उपनि/ ठाणे शहर/बी-७/नाराठे/ ६२९७ /सन २०१८
दिनांक - ५/०३/२०१८

प्रति,
श्री. एच. एस. कुंडु (मुख्यप्रवर्तक)
(नियो) हबटाऊन ग्रीनवुडस ' डी ' को-ऑप हौसींग सोसायटी लि.
सर्व्हे नं. २१५/१ बी, २१५/२ बी, २१६ आणि २१८,
वर्तकनगर, पोखरण रोड नं.१, माजीवडे,
ठाणे (प), ता.जि. ठाणे.

**विषयः- नियो हबटाऊन ग्रीनवुडस 'डी ' को-ऑप हौसींग सोसायटी लि. यांचे नांव राखुन <u>बँकेत खाते उघडण्यास परवानगी मिळणेबाबत.</u>**

महोदय,

कृपया आपले लक्ष आपल्या दिनांक ०३/०३/२०१८ च्या वरील विषयासंबंधीच्या पत्राकडे वेधण्यात येते की, आपल्या नियोजित संस्थेचे नांव (नियोजित) हबटाऊन ग्रीनवुडस 'डी ' को-ऑप हौसींग सोसायटी लि. सर्व्हे नं. २१५/१ बी, २१५/२ बी, २१६ आणि २१८, वर्तकनगर, पोखरण रोड नं.१, माजीवडे, ठाणे (प), ता.जि. ठाणे असे राखुन ठेवण्यात येत असून आपणास नियोजित संस्थेच्या नावाने दि ठाणे जिल्हा मध्य.सहकारी बँक लि.शाखा - ठाणे शहर या बँकेत खाते उघडण्यास परवानगी खालील अटीवर देण्यात येत आहे.

१ नांव राखुन ठेवल्यापासून तीन महिन्याच्या आंत संस्थेने संपूर्ण नोंदणी प्रकरणे या कार्यालयात सादर करावे.
२ नांव राखुन ठेवलेले नांव तीन महिन्यापर्यंतच राहील, नोंदणी प्रकरण तीन महिन्याच्या आत न आल्यास नियोजित संस्थेचे नांव रदद समजण्यात येईल.
३ तीन महिन्यात नोंदणी प्रकरण सादर करणे शक्य न झाल्यास संयुक्तीक कारणास्तव मुदतवाढी साठी मुदत अर्ज सादर करावा.
४ नियोजित संस्थेच्या नावाने खाते मुख्यप्रर्वतकाच्या सहीने उघडण्यात यावे.
५ नियाजित संस्थेच्या नावाने उघडलेल्या खात्यातील रक्कम त्यांनी संस्था नोंदणी होऊन संस्थेच्या नावाने कारभार सुरु होईपर्यंत नोंदणी अधिका-यांच्या पुर्वपरवानगी शिवाय काढण्यात येऊ नये.
६ या कार्यालयाच्या अटींची पुर्तता तसेच आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता प्रस्ताव सादर करतेवेळी करणेंत यावी.
७ नियोजित संस्थेच्या नावाने नांव राखुन ठेऊन बँकेत खाते उघडण्यास परवानगी दिली म्हणजे संस्था नोंदणी होईलच असे नाही, याची नोंद घ्यावी.
८ नोंदणी प्रस्ताव सादर करताना आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडण्यात यावीत.

यापुढे संपूर्ण पत्रव्यवहार आपण नियोजित संस्थेच्या नावाने करावा.

उपनिबंधक
सहकारी संस्था, ठाणे शहर, ठाणे

(शिक्का: उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे शहर, यांचे कार्यालय)

प्रत
मा.व्यवस्थापक, दि.ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा - ठाणे शहर.

उपनिबंधक